नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १११ Issue - 111 | वार - मंगळवार दि. १५ सप्टेंबर २०२६ Blow- Tuesday Date 15 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# दिशा सालियन प्रकरणात अखेर मुंबई पोलिसांकडून गुन्हा दाखल

## अत्याचार आणि हत्येचा ठपका; अखेर गुन्हा दाखल





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई - राजधानी मुंबईतील बहुचर्चित दिशा सालियन मृत्यू प्रकरणी अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिशाचे वडील सतिश सालियान यांनी दोन दिवसांपूर्वी सीबीआयकडे आपला जबाब नोंद केला होता. त्यानंतर, आरोपींना लवकर अटक करावी, अशी मागणीही त्यांनी केली होती. त्यानुसार, सीबीआयने सतिश सालियान यांच्या जबाबावर दिशाच्या मृत्यूप्रकरणात अखेर गुन्हा दाखल करत एफआयआर नोंदवला आहे. मात्र, या एफआयआरमध्ये नेमकं कोणाला आर-ोपी करण्यात आलंय, ते अद्याप समोर आलं नाही.

दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूतची मॅनेजर म्हणून दिशा काम करत होती. तर, त्यापूर्वीही काही अभिनेत्यांसाठी तिने मॅनेजर म्हणून काम केलं आहे. मात्र, सुशांतच्या मृत्यूपूर्वी अवघ्या ६ दिवस अगोदर दिशाचा मृत्यू झाला होता. त्यावेळी, दिशाने आत्म हत्या केल्याचं सांगण्यात आलं होतं. तर, दिशाने आत्महत्या केली असून तिच्या मृत्यूमागे कटकारस्थान असल्याचा आरोप तिच्या पालकांनी केला होता. तसेच, दिशावर अत्याचारकरून हत्या केल्याचा देखील आरोप करण्यात येत होता. अखेर, उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर दिशाच्या मृत्यूप्रकरणी सहा वर्षांनी गुन्हा दाखल करण्यात आला.

भा.दं.वि. कलम ३०२ (हत्या) ३७६ (सामूहिक अत्याचार), १२०(ब) कट रचणे, २०१ (पुरावे नष्ट करणे) तसेच २१७ आणि २१८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे, सामूहिक अत्याचार आणि खून प्रकरणाचा गुन्हा दाखल झाला आहे.

बॉलिवूड अभिनेता सुशांत सिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियन हिच्या मृत्यूबाबत सीबीआय चौकशी आणि एफआयआर दाखल करण्याचे निर्देशही उच्च न्यायालयाने दिले आहेत. ८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड येथील एका इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून पडून दिशाचा मृत्यू झाला होता.

दिशाच्या मृत्यूनंतर अवघ्या सहा दिवसांनी, म्हणजेच १४ जून २०२० रोजी सुशांत सिंह राजपूतचाही मृत्यू झालेला. दरम्यान, दिशाचे वडील सतीश सालियन यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आपल्या मुलीच्या मृत्यूची नव्यानं चौकशी करण्याची आणि सीबीआयद्वारे तपास करण्याची मागणी केली होती.

दिशा सालियनचा मृत्यू ८ जून २०२० रोजी झाला होता. त्यानंतर तीन दिवसांनी तिचे पोस्टमॉर्टम झाल्याची नोंद आहे. त्यामध्ये दिशाच्या शरी-रावर हाताला, पायाला, छातीवरही जखमा झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. दिशाच्या डोक्यावर गंभीर जखम झाल्यामुळेच तिचा मृत्यू झाल्याचं या रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आलं आहे.

तसेच दिशाच्या नाकातून आणि तोंडातून देखील रक्त येत होतं, असं देखील रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आलं आहे. मात्र तिच्यावरती कुठलाही लैंगिक अत्याचार किंवा बलात्कार झालेला नाही असं रिपोर्टमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आलं आहे.

# 'मराठा आंदोलकांच्या मागण्या मान्य, पण काही गोष्टी शक्य नाही'



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : 'मराठा आंदोलकांच्या जवळपास सर्वच मागण्या राज्य सरकारने पूर्ण केल्या आहेत. काही मागण्या न्यायालयाच्या निर्णयाधीन आहेत. न्यायालय किंवा इतर संवैधानिक पद्धतींचा अवलंब करूनच त्या आपण पूर्ण करू शकतो. त्यामुळे सध्या गणेशपर्व सुरू असताना मुंबईत आंदोलन करून गणेशभक्तांना असुविधा होईल असे वागणे कोणासाठीच योग्य नाही. त्यामुळे मुंबईतील आंदोलनाचा पुनर्विचार व्हावा,' असे आव-ाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. 'समान ना-गरी कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात राज्य सरकारने याआधीच समिती स्थापन केली आहे. या समितीच्या अहवालानंतर याबाबतचा निर्णय घेऊ,' असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वर्षा या निवासस्थानी गणेशाची प्राणप्रतिष्ठा झाली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. 'जरांगे यांच्या ज्या मागण्या राज्यघटनेला अनुसरून आहेत त्या करायला तयार आ-होत; पण ज्या मागण्या कायदा, न्यायालयीन नियम यांच्या बाहेरच्या असतील त्या मान्य करू शकत नाही. आम्ही चर्चे ची दारे बंदही केलेली नाहीत,' असेही मुख्यमंत्री म्हणाले.

'ब्रिक्स' परिषदेत केवळ शाकाहारी जेवण ठेवल्याबद्दल लोकसभेतील विरोधी पक्ष-नेते राहुल गांधी यांनी टीका केली होती. त्याबाबत विचारले असता,

'छोट्या मनाचे लोक किंवा अनेक वेळा बुद्धी संकुचित झाली, की अशा प्रकारे वागतात. ब्रिक्स ही केवळ जेवणासाठी नव्हती. या परिषदेची सर्वांत म ोठी यशस्विता म्हणजे, सगळ्या देशांनी इतक्या संवेदनशील परिस्थितीत दिल्ली जाहीरनामा मान्य केला, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

मुंबईत आपण एकटे जाण-ार असल्याचे मनोज जरांगे-पाटील यांनी सोमवारी (१४ सप्टेंबर) अंतरवाली सराटी येथे सांगितले. 'आपल्यासोबत कोणत्याही मराठा आंदोलकांनी येऊ नये. आपण सांगू त्या वेळी

### सीएम फडणवीसांचं मोठं विधान, मनोज जरागेंचं मुंबईकडे प्रस्थान

सगळे मुंबईत या,' असेही ते या वेळी म्हणाले. 'पोलिसांनी आझाद मैदानावर जमावाने आंदोलन करण्यास परवानगी नाकारली आहे. त्यामुळे आता आपण एकटेच येतो. सोबत चार जण असतील. आता परवानगी नाकारण्याचे कारण नाही,' असेही त्यांनी सांगितले. 'आपल्यासोबत दोन रुग्णवाहिका आणि दोन गाड्या असतील. मुंबईत जाण्याचा मार्ग पूर्वीचाच असेल. गुरुवारी (१९ सप्टेंबर) मुंबईत पोहोचून आमरण उपोषण सुरू केलेले असेल,' असेही ते म्हणाले. शनिवारी रात्रीपासून जरांगे यांनी सलाइन लावून घेणे बंद केले आहे. त्यामुळे त्यांची प्रकृती ढासळत आहे. आज, मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास जरांगे मुंबईला निघणार आहेत.

# पावसाअभावी बळीराजा मोठ्या संकटात; राज्य सरकारकडून परिस्थितीचा आढावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पावसाच्या अभावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर सरकार निर्णय घेईल. विकासात्मक कामे काही काळ बाजूला ठेवून शेतकरी आणि शेतमजुरांचा नक्कीच विचार केला जाईल, असा विश्वास राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केला आहे. राज्यात पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे शेतकरी (ऋीशीी) हवालदिल झाला आहे. सोयाबीन, कापूस, मूग, उडीद आणि तूर यांसारखी खरीप पिके संकटात सापडली आ-हेत. पाऊस नसल्यामुळे उसाची वाढही अपेक्षेप्रम ाणे होताना दिसत नाही. त्यातच ऊस लागवडीची स्थिती राज्यातील अनेक भागांत चिंताजनक बनली आहे.

गेल्या तीन महिन्यांपासून अनेक ठिकाणी ढगाळ वातावरण आणि अधूनम धून होणाऱ्या रिमझिम पावसाचीच परिस्थिती आहे. त्यामुळे खरीप हंगाम हातचा जाण्याची शक्यता निर्माण झाली असून, आगामी रब्बी हंगामही आशादायक दिसत नाही. पावसाअभावी भविष्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता यांसारख्या समस्या गंभीर होण्याची शक्यता आहे. प्रकल्पांमध्ये असलेला अत्यल्प पाणीसाठा आणि कोरडे पडलेले नदीपात्र पुढील संकटाची चाहूल देत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य सरकारने परिस्थितीचा अहवाल मागवला आहे. या अहव-ालावर उद्या होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

# पर्यावरणपूरक आणि पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : परंपरेचे जतन आणि पर्यावरणाचे संरक्षण यांचा समतोल साधणे ही सामूहिक जबाबदारी आहे. गणेशोत्सवाचा आनंद घेताना पर्यावरणाची हानी होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. पारंपरिक पद्धतींचा आदर राखत पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करण्याचे आ-वाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. गणेश चतुर्थीच्या मंगलमय मुहूर्तावर मुख्यमंत्र्यांचे मुंबईतील निवासस्थान 'वर्षा' येथे श्रीगणेशाची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी सहकुटुंब पारंपरिक पद्धतीने बाप्पाची पूजा-अर्चा करून आरती केली. श्रीगणेशाच्या चरणी प्रार्थना केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील तसेच देशभरातील गणेशभक्तांना गणेशोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. विघ्नहर्त्याने सर्वांच्या जीवनात आनंद आणून सर्व विघ्ने दूर करावीत. देश,



राज्य, नागरिक आणि बळीराजासमोरील अडचणी दूर होऊन सर्वांना नवचैतन्य, सामर्थ्य आणि समृद्धी लाभावी, अशी प्रार्थना त्यांनी यावेळी केली.

मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात गणेशोत्सवाचा उत्साह ओसंडून वाहत आहे. गणेशोत्सव हा श्रद्धा, आनंद आणि परंपरेचा उत्सव आहे. सर्व गणेशभक्तांनी हा उत्सव आनंदाने आणि भक्तिभावाने साजरा करावा. मात्र, गणेशोत्सवाच्या उत्साहाबरोबरच पर्यावरणाचे भान राखण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

**हिंदी, मराठीसह सर्व भारतीय भाषांचा परस्पर आदर करण्याचा संकल्प करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे प्रतिपादन**

# भारतीय भाषांच्या सन्मानातूनच 'एक भारत, श्रेष्ठ भारत'ची संकल्पना साकार होईल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे (जिमाका): भारतीय भाषांचे संवर्धन, सन्मान आणि विकास हा केंद्र शासनाचा प्रमुख आणि दृढ संकल्प असून सर्व प्रादेशिक भाषा या कम ळाच्या विविध पाकळ्यांप्रमाणे सुंदर आहेत. या सर्व समृद्ध भाषांचा आदर राखत हिंदीला त्यांच्यामध्ये समन्वय साधणारा 'मध्यमणी' बनवूया, असे आवाहन केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह यांनी केले.

वाशी येथील सिडको एक्झिबिशन अँड कन्व्हेंशन सेंटरमध्ये केंद्रीय गृह मंत्रालयाच्या राजभाषा विभागाच्या वतीने आयोजित 'हिंदी दिवस २०२६' आणि 'सहाव्या अखिल भारतीय राजभाषा संमेलना'चे उद्घाटन अत्यंत उत्साहात संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय, खा-सदार नरेश म्हस्के, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, राजभाषा विभागाच्या सचिव अंशुली आर्या, व्ही.एल. कांताराव, बंकिम चंद्र चट्टोपाध्याय यांचे वंशज जॉयदीप चट्टोपाध्याय, मिलिंद प्रभाकर सबनीस हे मान्यवर उपस्थित होते.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले की, राजभाषा संमेलने केवळ राजधानी दिल्लीपुरती मर्यादित न ठेवता देशातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये नेण्याचा केंद्र शासनाचा निर्णय यशस्वी ठरला असून, या उपक्रमांतर्गत हे सहावे संमेलन महाराष्ट्रात होत आहे.

महाराष्ट्रातील गणेशोत्सव आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सवाला लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी व्यापक स्वरूप देऊन देशात सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि देशभक्तीची भावना चेतव-ली. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वशासनासोबतच स्वधर्म आणि स्वभाषेला अग्रक्रम देत मराठीच्या विकासासाठी राजव्यवहार कोश तयार केला होता. तसेच गुलामगिरीच्या काळात ऋषी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी 'आनंदमठ'मध्ये रचलेले 'वंदे मातरम्' हे केवळ एक गीत नसून स्वातंत्र्यलढ्याची राष्ट्रीय उद्घ-ोषणा ठरले होते.

ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शासकीय समारंभांम ध्ये 'वंदे मातरम्' पूर्ण स्वरूपात सादर करण्याची परंपरा पुन्हा सुरू केली आहे, तसेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा बहुमान देऊन महाराष्ट्राच्या ऐतिहासिक अस्मितेचा गौरव केला आहे. मातृभाषेचे म हत्त्व विषद करताना गृहमंत्री म्हणाले की, मातृभाषा ही मानवी विचारप्रक्रियेचा मूळ पाया असून ती व्यक्तीला स्वतःच्या संस्कृती, परंपरा आणि मूल्यांशी जोडून ठेवते. याच कारणास्तव राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षणावर भर देण्यात आला आहे. यासोबतच देशाशी नाते अधिक दृढ करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक तरी अन्य भारतीय भाषा शिकली पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राजभाषा विभागाने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर



सुरू केला असून, भारत सरकारच्या पाच लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांना हिंदीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'कंठस्थ २.०' प्रणाली पाच कोटींपेक्षा अधिक वाक्यांसह उपलब्ध करण्यात आली असून 'लीला राजभाषा' व 'लीला प्रवाह'च्या माध्यमातून भाषा शिक्षणाला गती मिळाली आहे. सुरुवातीला ५१ हजार शब्द असलेला 'हिंदी शब्दसिंधू' शब्दकोश आता आठ लाख शब्दांपर्यंत विस्तारला असून २०२९ पर्यंत तो जगातील सर्वांत मोठा शब्दकोश बनेल, असा ठाम विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. हिंदी, मराठीसह सर्व भारतीय भाषांचा पर-स्पर आदर करण्याचा संकल्प करा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मनोगतात त्यांनी सांगितले की, माझी आई मराठी आहे, मात्र देशातील इतर सर्व भाषा माझ्या मावशीसारख्या आहेत. आईचा गौरव करतानाच मावशीचाही पूर्ण सन्मान राखला पाहिजे. तसेच हिंदी, मराठीसह सर्व भारतीय भाषांचा पर-स्पर आदर करण्याचा संकल्प करा. ते म्हणाले, मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने विद्यार्थ्यांची आकलनक्षमता आणि शिक्षणाची गुणवत्ता लक्षणीयरीत्या उंचावते. भारतीय भाषांचे ज्ञान वाढवूनच 'एक भारत, श्रेष्ठ भारत' ही संकल्पना खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात येईल. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या सर्वोच्च जागतिक व्यासपीठावर हिंदीतून भाषण करून देशाचा सन्मान वाढवला होता, याची आठवण त्यांनी करून दिली. जगातील अनेक प्रगत देश आपापल्या मातृभाषांचा अत्यंत स्वाभिमानाने वापर करतात, त्यामुळे भारतानेही स्वतःच्या समृद्ध भाषांचा दैनंदिन व प्रशासकीय कामकाजात अधिकाधिक वापर केला पाहिजे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणा-ले की, हिंदी ही सर्व भारतीय भाषांची सखी असून महाराष्ट्रात या संमेलनाचे आयोजन होणे हा मराठी भाषेचाही मोठा गौरव आहे. मराठी आणि हिंदी या दोन्ही देवनागरी लिपीत लिहिल्या जाणाऱ्या सख्ख्या भगिनी भाषा आ-हेत. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि संत नामदेव महाराज यांच्या विचारांनी संपूर्ण देशाला दिशा दिली असून संत नामदेवांच्या रचना गुरु ग्रंथ साहिबम ध्ये सन्मानाने समाविष्ट आहेत. २०१४ पूर्वीच्या तुलनेत आज केंद्र सरकारच्या कामकाजात हिंदीचा वापर लक्षणीय वाढला असून, तो केवळ संवादापुरता न राहता विज्ञान, तंत्रज्ञान, पोलीस, कायदा व न्यायव्यवस्थेतही वेगाने वाढला पाहिजे. महाराष्ट्रात स्थायिक झालेल्या हिंदी भाषिक नागरिकांनी मराठी भाषेचा आदर करत राज्याच्या सर्वांगीण विकासात मोलाचा हातभार लावला असल्याचे त्यांनी नमूद केले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी गणेश चतुर्थीच्या पावन मुहूर्तावर हिंदी दिवस साजरा होणे हा अत्यंत शुभ योग असल्याचे सांगितले. गणेशोत्सव हा समाजातील विघ्ने दूर करून एकात्मता साधणारा उत्सव आहे. भारतात भाषा अनेक असल्या तरी भारतीयांची राष्ट्रीय भावना एकच आहे. प्रशासन, शिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानात भारतीय भाषांचा वापर वाढवण्याची मोठी गरज असून, मराठी आणि हिंदी साहित्यात परस्पर अनुवादाची समृद्ध देवाणघेवाण झाली आहे. मुंबई आणि नवी मुंबईसारख्या शहरांमध्ये विविध भाषिक समाज गुण्यागोविंदाने राहत असून हीच 'एक भारत, श्रेष्ठ भारत'ची खरी ओळख आहे. शासनाची भाषा ही क्लिष्ट न राहता सर्वसामान्य माणसाला सहज समजेल अशी सोपी असावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## संपादकीय....

# बळीराजा संकटात

गेल्या तीन महिन्यांपासून अनेक ठिकाणी ढगाळ वातावरण आणि अधूनमधून होणाऱ्या रिमझिम पावसाचीच परिस्थिती आहे. त्यामुळे खरीप हंगाम हातचा जाण्याची शक्यता निर्माण झाली असून, आगामी रब्बी हंगामही आशादायक दिसत नाही. पावसाअभावी भविष्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता यांसारख्या समस्या गंभीर होण्याची शक्यता आहे. प्रकल्पांमध्ये असलेला अत्यल्प पाणीसाठा आणि कोरडे पडलेले नदीपात्र पुढील संकटाची चाहूल देत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य सरकारने परिस्थितीचा अहवाल मागवला आहे. पावसाच्या अभावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर सरकार निर्णय घेईल. विकासात्मक कामे काही काळ बाजूला ठेवून शेतकरी आणि शेतमजुरांचा नक्कीच विचार केला जाईल, असा विश्वास राज्य सरकारने व्यक्त केला आहे. राज्यात पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. सोयाबीन, कापूस, मूग, उडीद आणि तूर यांसारखी खरीप पिके संकटात सापडली आहेत. पाऊस नसल्यामुळे उसाची वाढही अपेक्षेप्रमाणे होताना दिसत नाही. त्यातच ऊस लागवडीची स्थिती राज्यातील अनेक भागांत चिंताजनक बनली आहे. लातूर जिल्ह्यातील अनेक भागात परिस्थिती चिंताजनक आहे. सरकार या सर्व परिस्थितीचा गांभीर्याने विचार करत आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर चर्चा होणे अपेक्षित असून, गरज भासल्यास काही विकासात्मक कामे बाजूला ठेवून सर्वसामान्य शेतकरी आणि शेतमजुरांच्या हिताचा नक्कीच विचार केला जाईल.

# श्रीगणेश चतुर्थी : युवकांमध्ये राष्ट्रतेज जागृत करण्यासाठी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**(१४–२४ सप्टेंबर; श्रीगणेश चतुर्थी– गणेशोत्सव विशेष.)**

भारतात सार्वजनिक गणेशोत्सव हे भारतीयांना एकत्र आणण्यासाठी आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी सन १८९४ साली केली. या काळात गणेशाच्या उपस्थितीत अनेक धार्मिक व सामाजिक सार्वजनिक कार्यक्रम केले जातात. भारतीय स्वातंत्र्य लढ्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या व्यासपीठाचा वापर केला. गणेशोत्सव आणि शिवजयंती या प्रसंगांचे औचित्य साधून टिळकांनी युवकांमध्ये राष्ट्रतेज जागृत करण्याचा प्रयत्न केला. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांचा सदर माहितीपूर्ण संकलित लेख प्रस्तुत जी... संपादक.

श्रीगणेश चतुर्थी हा हिंदूंचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि आनंदाचा सण आहे. गणेश चतुर्थी म्हणजे काय? हा सण भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील चतुर्थीला साजरा केला जातो. हा गणपती बाप्पाचा जन्मोत्सव मानला जातो. गणपती हा बुद्धी, समृद्धी आणि विघ्नहर्ता– संकटे दूर करणारा) मानला जातो. प्राणप्रतिष्ठा आणि पूजन विधीया दिवशी घरात किंवा सार्वजनिक मंडळात गणेशाच्या मातीच्या (पार्थिव) मूर्तीची स्थापना केली जाते. षोडशोपचारांनी (सोळा उपचारांनी) बाप्पाची पूजा केली जाते. पूजेत बाप्पाला २१ पत्री (विविध प्रकारची पाने), दुर्वा, फुले आणि मोदकांचा नैवेद्य दाखवला जातो. सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्वामुळे लोकमान्य टिळकांनी आणि इतर स्वातंत्र्यसैनिकांनी या सणाला सार्वजनिक स्वरूप दिले, जेणेकरून लोक एकत्र येऊ शकतील. हा सण एकता, भक्ती आणि संस्कृतीचा संदेश देतो. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करणे आजच्या काळात अत्यंत गरजेचे आहे. तुम्हाला गणेशोत्सवाविषयी आणखी काय जाणून घ्यायला आवडेल? जसे की:पूजेचा विधी आणि साहित्य गणेशोत्सवाचा इतिहास नैवेद्य आणि मोदक, आदीबद्दल मी अधिक माहिती देत आहे.

चतुर्थीला गणेशाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. श्री गणेशाच्या प्रतिष्ठापना विधीमध्ये पार्थिव मूर्तीची आवाहन, स्नान, अभिषेक, वस्त्र, चंदन, फुले, पत्रे... श्रीगणेश चतुर्थी फक्त सण साजरा करण्याचा नाही, तर त्यामागचा सामाजिक दृष्टीकोनही महत्त्वाचा आहे. गणेश चतुर्थी हा सण भक्तीचा, संस्कृतीचा, आणि एकतेचा सण आहे. गणपती बाप्पा.. काही वर्षी हरतालिका आणि गणेश चतुर्थी एकाच दिवशी, यापूर्वी सन २०००, २००६ आणि २००९ मध्ये हरतालिका आणि श्री गणेश चतुर्थी एकाच दिवशी आले होते. यानंतर सन २०३२ मध्येही असाच योग येणार आहे असे पंचांग कर्ते खगोल अभ्यासक सांगतात. श्री गणेश चतुर्थी हा हिंदूंचा मोठा सण आहे. श्री गणेश चतुर्थी हे भाद्रपद शुक्ल चतुर्थीला केले जाणारे एक धार्मिक व्रत आहे. गणेशाच्या अवतारांपैकी श्रीगणेशजींचा जन्म. गणेश पुराण कथासार– गणेश पुराण या संस्कृत ग्रंथातील कथांचा मराठीतील सारांश किंवा कथांचे संकलन होय, ज्यात गणेशाचे अवतार, लीला, विविध कथा आणि तत्त्वज्ञान यांनी परिपूर्ण आहे.



श्रीगणेश चतुर्थी हे भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्ष चतुर्थीला केले जाणारे एक धार्मिक व्रत आहे. गणेश चतुर्थी या दिवसाला महासिद्धीविनायकी चतुर्थी किंवा शिवा असेही म्हटले जाते. या चतुर्थीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आणि स्थान आहे. असे मानले जाते की, गणेशाला प्रसन्न केल्याने घरात सुख समृद्धी आणि शांती प्रस्थापित होते. गणेशाला मोदक खूप आवडतात. म्हणूनच गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशाला मोदकांचा नैवेद्य अर्पण केला जातो, त्याचप्रमाणे जास्वंदीचे फुल, शमी पत्री आणि दुर्वा या ही खूप आवडीच्या असल्यामुळे त्याही अर्पण केल्या जातात. उंदीर हे गणेशाचे वाहन आहे. स्त्रीमनाचे लोकदैवत असेही श्री गणेशाला मानतात. श्रीगणेश चतुर्थीच्या पहिल्या दिवशी गणपतीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते आणि गणपतीच्या पूजेनंतर आरती केली जाते. प्रमुख्याने माती पासूनच बनवलेल्या गणेश मूर्तिचे पूजन केले जाते. गोव्यातील गाणपत्य संप्रदायाचे हे एक व्रत आहे.

श्रावण शुक्ल चतुर्थी ते भाद्रपद शुक्ल चतुर्थी असे महिनाभर करायचे हे व्रत आहे. नदीकिनारी जाऊन, स्नान करून आपल्या हाताच्या अंगठ्याएवढी मातीची गणेशमूर्ती हातावरच तयार करतात. तिचे सोळा उपचारांनी पूजन करून ती एका नदीतच विसर्जन करतात, असे हे व्रत आहे. याला पार्थिव गणेश व्रत म्हणतात. महिनाभर जमले नाही तर किमान शेवटच्या दिवशी तरी पार्थिव मूर्तीची पूजा करावी अशी यामागे धारणा आहे.

गणेशोत्सव: प्रतिष्ठापना पूजा– घरगुती गणेश स्थापना– गणेश चतुर्थीला गणेशाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. श्री गणेशाच्या प्रतिष्ठापना विधीमध्ये पार्थिव मूर्तीचे आवाहन, स्नान, अभिषेक, वस्त्र, चंदन, फुले, पत्री, नैवेद्य इ.सोळा उपचारांनी पूजा केली जाते. यामध्ये त्याला विविध २१ पत्री अर्पण केल्या जातात. पावसाळ्यात या सर्व पत्री सामान्यतः उपलब्ध असतात आणि त्या प्रत्येक वनस्पतीला काही औषधी गुणधर्मही आहेत. मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी तिची उत्तरपूजा करतात. मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी पुढील मंत्र म्हणतात. यान्तु देवगणा: सर्वे पूजामादाय पार्थिवीम् । इष्टकामप्रसिद्ध्यर्थं पुनरागमनाय च ।। श्री महागणपतिपूजन केलेल्या नारळावर तसेच उमामहेश्वर आणि श्री सिद्धिविनायक यांच्यावर अक्षता वाहून मूर्ती स्थानापासून थोडी हलवतात. त्यानंतर जलाशयात तिचे विसर्जन करतात. काळाच्या ओघात हे व्रत कुटुंबाच्या पद्धतीनुसार दीड, पाच, सात, दहा दिवस केले जाते. काही कुटुंबात २१ दिवस हे व्रत करतात, तर काही ठिकाणी हे व्रत वार्षिक स्वरूपाचे असते. या दिवशी किंवा घरात गणपती असेपर्यंत अथर्वशीर्ष स्तोत्राचे पठण केले जाते. काही ठिकाणी गणेशगीता या ग्रंथाचे वाचनही केले जाते. गणपती ही संघटनेची देवता आहे. ऋग्वेदात ब्राह्मणस्पती देवतेची स्तुती केलेली आहे. तो सर्व गणांचा अधिपती आहे असे त्यात म्हटले आहे. या देवतेचा विकास होऊन पुराणकाळात तिला गणपती हे रूप प्राप्त झाले, असे मानले जाते. भाद्रपद शुक्ल चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत महाराष्ट्रात गणेशोत्सव साजरा होत असतो. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक धोरणानुसार सन २०२५ साली गणेशोत्सवाला राज्योत्सव अशी मान्यता जाहीर करण्यात आली आहे. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!!! श्रीगणेशोत्सवाच्या समस्त भाविकभक्तांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!!

**– संकलन व सुलेखन –**
**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
**राह. श्रीगुरूदेव हरदेवकृपा निवास,**
**पॉवर हाऊसच्या मागे, एकता चौक,**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.**

# भारतीय लोकशाही आणि नागरिकांची उदासीनता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दरवर्षी १५ सप्टेंबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन' म्हणून साजरा केला जातो. लोकशाही ही केवळ शासनव्यवस्था नसून स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, मानवी प्रतिष्ठा आणि जनसहभाग यांवर आधारलेली जीवनपद्धती आहे. लोकशाहीमध्ये जनता ही सत्तेचा अंतिम स्रोत मानली जाते. नागरिकांना आपल्या प्रतिनिधींची निवड करण्याचा अधिकार असतो आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींनी जनतेपुढे उत्तरदायी राहणे अपेक्षित असते. भारताने स्वातंत्र्यानंतर लोकशाही प्रजासत्ताकाचा स्वीकार करून विविधतेने नटलेल्या विशाल देशात लोकशाही व्यवस्था यशस्वीपणे रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, स्वतंत्र निवडणूक व्यवस्था, संविधानिक संस्था आणि कायद्याचे राज्य या आधारांवर भारतीय लोकशाहीची वाटचाल झाली. मात्र, लोकशाहीच्या या प्रवासात एक गंभीर आव्हान सातत्याने जाणवते ते म्हणजे नागरिकांची वाढती उदासीनता होय. मतदानापुरते नागरिकत्व मर्यादित राहणे, सार्वजनिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे, शासनाच्या कामकाजाची माहिती न घेणे, चुकीच्या माहितीवर सहज विश्वास ठेवणे आणि आपल्या अधिकारांइतकीच कर्तव्येही महत्त्वाची आहेत याची जाणीव कमी होणे, या प्रवृत्ती लोकशाहीसाठी चिंताजनक आहेत. लोकशाही मजबूत करण्यासाठी सक्षम संस्था जितक्या आवश्यक आहेत, तितकाच जागरूक, विवेकी आणि सक्रिय नागरिकही आवश्यक आहे.

भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान राजकीय अधिकार दिले आहेत. धर्म, जात, भाषा, लिंग, आर्थिक स्थिती किंवा सामाजिक पार्श्वभूमी यांचा विचार न करता प्रौढ नागरिकाला मतदानाचा अधिकार देण्यात आला. हा अधिकार केवळ शासन निवडण्याचे साधन नाही, तर नागरिकाच्या राजकीय अस्तित्वाची मान्यता आहे. सामान्य माणसाचे मत आणि सत्तेच्या सर्वोच्च स्तरावरील व्यक्तीचे मत मतदानाच्या प्रक्रियेत समान मूल्याचे असते. हीच राजकीय समानता लोकशाहीचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. परंतु मतदानाचा अधिकार असूनही जर नागरिकाने निवडणुकीच्या दिवशी मतदान करण्यापलीकडे सार्वजनिक जीवनाशी संबंध ठेवला नाही, तर लोकशाहीतील त्याचा सहभाग अपुरा ठरतो. लोकशाहीमध्ये नागरिक हा केवळ मतदार नसतो; तो शासनाचा निरीक्षक, प्रश्न विचारणारा, सहभागी आणि उत्तरदायित्वाची मागणी करणारा घटक असतो. त्यामुळे नागरिकांची उदासीनता ही केवळ वैयक्तिक बाब नसून लोकशाहीच्या गुणवत्तेशी संबंधित प्रश्न आहे.

नागरिकांच्या उदासीनतेचे सर्वांत स्पष्ट उदाहरण म्हणजे सार्वजनिक प्रश्नांपासून दूर राहण्याची प्रवृत्ती होय. आपल्या परिसरातील रस्ते खराब असतील, पाणीपुरवठा अनियमित असेल, सार्वजनिक आरोग्यसेवा अपुरी असेल, शाळांमध्ये सुविधा कमी असतील किंवा सार्वजनिक निधीच्या वापराबाबत प्रश्न निर्माण होत असतील, तरी अनेक नागरिक त्याकडे 'हे सरकारचे काम आहे' या भावनेने पाहतात. शासनाचे काम जनतेसाठी असले तरी शासनाला योग्य प्रश्न विचारणे आणि प्रशासनाकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा करणे हे नागरिकांचेही कर्तव्य आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील प्रश्न समजून घेऊन ग्रामसभा, नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक सुनावण्या आणि उपलब्ध घटनात्मक व कायदेशीर मार्गांचा वापर केला तर लोकशाही तळागाळापर्यंत अधिक प्रभावी होऊ शकते. मात्र, 'आपण काही केले तरी काय बदलणार?' अशी मानसिकता लोकशाहीतील सक्रिय सहभागाला अडथळा निर्माण करते.

मतदानाबाबतची उदासीनता हा देखील गंभीर विषय आहे. मतदान हा प्रत्येक पात्र नागरिकाचा महत्त्वपूर्ण अधिकार आहे; परंतु काही नागरिक मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राकडे जाण्याऐवजी आपल्या दैनंदिन कामाला किंवा वैयक्तिक सोयीला अधिक महत्त्व देतात. काही जण राजकारणाबद्दल नाराजी व्यक्त करतात, परंतु त्या नाराजीचे रूप मतदानातून किंवा घटनात्मक सहभागातून व्यक्त करीत नाहीत. 'सर्वच उमेदवार सारखे आहेत', 'माझ्या एका मताने काय फरक पडणार?' किंवा 'राजकारणात काहीच बदलत नाही' अशा भावना लोकशाहीतील निष्क्रियता वाढवतात. प्रत्यक्षात प्रत्येक मत हे लोकशाहीच्या निर्णयप्रक्रियेतील एक महत्त्वाचे साधन आहे. उमेदवारांची माहिती घेणे, त्यांच्या सार्वजनिक भूमिकेचा अभ्यास करणे आणि विवेकपूर्वक मतदान करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. मतदान न करण्याची उदासीनता ही अप्रत्यक्षपणे इतरांच्या निर्णयाला अधिक प्रभावी बनवू शकते.

नागरिकांच्या उदासीनतेमागे राजकीय प्रक्रियेबद्दल निर्माण झालेला अविश्वास हे एक कारण असू शकते. राजकारणातील भ्रष्टाचार, आश्वासनांची पूर्तता न होणे, वाढता निवडणूक खर्च, राजकीय संघर्षातील कटुता किंवा सार्वजनिक संस्थांवरील अविश्वास यामुळे काही नागरिक राजकीय प्रक्रियेपासून दूर जातात. मात्र, लोकशाहीतील त्रुटींवर नाराजी व्यक्त करण्याचा सर्वांत प्रभावी मार्ग म्हणजे लोकशाही प्रक्रियेपासून दूर जाणे नव्हे, तर त्या प्रक्रियेत अधिक सक्रियपणे सहभागी होणे हा आहे. चांगले उमेदवार निवडणे, धोरणांवर चर्चा करणे, प्रश्न विचारणे, लोकप्रतिनिधींशी संवाद साधणे आणि आवश्यकतेनुसार शांततामय व संविधानिक मार्गाने जनमत तयार करणे यामुळे लोकशाहीतील सकारात्मक बदल शक्य होतात. उदासीनता बदल घडवून आणत नाही; जागरूक सहभागच बदलाचे माध्यम बनतो.

लोकशाहीतील नागरिकांची उदासीनता ही केवळ मतदानापुरती मर्यादित नसते. अनेक नागरिकांना संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्ये, स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार, शासनाच्या विविध योजनांची माहिती किंवा नागरिकांना उपलब्ध असलेल्या कायदेशीर मार्गांची पुरेशी माहिती नसते. माहितीचा अभाव हा लोकशाहीतील सहभाग कमी करणारा महत्त्वाचा घटक आहे. नागरिकांना आपले अधिकार आणि कर्तव्ये समजली तर ते शासनव्यवस्थेत अधिक प्रभावीपणे सहभागी होऊ शकतात. म्हणून लोकशाही साक्षरता ही सामान्य साक्षरतेइतकीच महत्त्वाची आहे. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि प्रसारमाध्यमांनी नागरिकांना संविधान, लोकशाही प्रक्रिया आणि सार्वजनिक संस्थांविषयी माहिती देण्याचे कार्य अधिक प्रभावीपणे करणे आवश्यक आहे.

आजच्या डिजिटल युगात नागरिकांच्या उदासीनतेचे स्वरूप काहीसे बदलले आहे. सामाजिक माध्यमांवर राजकीय विषयांवर मोठ्या प्रमाणावर चर्चा होते. अनेक नागरिक आपले मत व्यक्त करतात, सरकारच्या धोरणांवर प्रतिक्रिया देतात आणि विविध सार्वजनिक प्रश्नांवर भूमिका घेतात. मात्र, सामाजिक माध्यमांवरील सक्रियता आणि प्रत्यक्ष लोकशाही सहभाग यांमध्ये फरक आहे. एखाद्या विषयावर प्रतिक्रिया देणे, संदेश पुढे पाठविणे किंवा एखाद्या छायाचित्रावर मत व्यक्त करणे एवढ्याने लोकशाही सहभाग पूर्ण होत नाही. प्रत्यक्ष जीवनातील सार्वजनिक प्रश्नांमध्ये सहभागी होणे, सत्य माहिती मिळविणे, प्रशासनाकडे प्रश्न मांडणे आणि सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी योगदान देणे आवश्यक आहे. आभासी जगातील सक्रियता वास्तविक लोकशाही सहभागाची जागा घेऊ शकत नाही.

खोटी माहिती आणि अफवांचा प्रसार ही नागरिकांच्या उदासीनतेशी जोडलेली आणखी एक गंभीर समस्या आहे. माहितीचा स्रोत तपासण्याची सवय नसल्यास नागरिक सहजपणे चुकीच्या प्रचाराला बळी पडू शकतात. विशेषतः निवडणुकीच्या काळात अर्धसत्य, दिशाभूल करणारे संदेश आणि बनावट माहिती लोकमतावर परिणाम करू शकतात. एखादी माहिती आपल्या मताशी जुळते म्हणून ती खरी आहे असे मानणे ही लोकशाहीसाठी धोकादायक प्रवृत्ती आहे. विवेकी नागरिकाने प्रत्येक माहितीचा स्रोत तपासला पाहिजे, अधिकृत माहितीशी तिची पडताळणी केली पाहिजे आणि संशयास्पद माहिती पुढे पाठविणे टाळले पाहिजे. डिजिटल साक्षरता ही आज जबाबदार नागरिकत्वाची अत्यावश्यक अट बनली आहे.

नागरिकांची उदासीनता आणि सामाजिक असमानता यांचाही जवळचा संबंध आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ग्रामीण, वंचित किंवा उपेक्षित नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जगण्याच्या प्रश्नांमध्ये इतके गुंतून राहावे लागते की व्यापक सार्वजनिक प्रश्नांमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांच्याकडे वेळ, साधने किंवा माहिती उपलब्ध नसते. त्यामुळे लोकशाहीचा सहभाग केवळ औपचारिक अधिकार देऊन पूर्ण होत नाही. शिक्षण, रोजगार, आरोग्य, सामाजिक सुरक्षा आणि मूलभूत सुविधा यांचा विस्तार झाला तर नागरिकांचा सार्वजनिक जीवनातील सहभागही वाढतो. सामाजिक न्याय आणि लोकशाही सहभाग यांचे नाते त्यामुळे अत्यंत महत्त्वाचे आहे. समाजातील वंचित घटकांचा आवाज निर्णयप्रक्रियेत पोहोचविणे ही लोकशाहीची जबाबदारी आहे.

महिलांच्या लोकशाही सहभागाकडेही या संदर्भात पाहणे आवश्यक आहे. महिलांना मतदानाचा अधिकार मिळाल्यानंतरही त्यांच्या राजकीय सहभागाचा विस्तार होण्यासाठी अनेक सामाजिक अडथळे पार करावे लागले. घरगुती जबाबदाऱ्या, सामाजिक रूढी, आर्थिक अवलंबित्व, राजकीय क्षेत्रातील असुरक्षितता आणि निर्णयप्रक्रियेत मर्यादित प्रतिनिधित्व यांमुळे अनेक महिलांचा सार्वजनिक सहभाग अपेक्षेइतका प्रभावी होत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचे प्रतिनिधित्व वाढल्यामुळे तळागाळातील लोकशाहीला नवी दिशा मिळाली आहे. मात्र, प्रतिनिधित्वासोबत निर्णयक्षमता आणि स्वायत्तता वाढणेही आवश्यक आहे. महिलांचा आवाज सार्वजनिक धोरणांमध्ये प्रभावीपणे प्रतिबिंबित झाला तर लोकशाही अधिक समताधिष्ठित बनेल.

युवकांची उदासीनता हीदेखील चिंतेची बाब आहे. युवक हा देशाचा मोठा सामाजिक घटक असून लोकशाहीच्या भवितव्यात त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक युवक सामाजिक माध्यमांवर सक्रिय असले तरी प्रत्यक्ष सामाजिक आणि सार्वजनिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग मर्यादित राहतो. राजकीय प्रश्नांचा सखोल अभ्यास करण्याऐवजी क्षणिक लोकप्रियतेवर आधारित मत तयार होणे ही धोकादायक बाब आहे. युवकांनी संविधानाचा अभ्यास करणे, विविध राजकीय विचार समजून घेणे, सार्वजनिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास करणे आणि सामाजिक कार्यात सहभागी होणे आवश्यक आहे. चर्चासत्रे, संविधान दिनाचे उपक्रम, सामाजिक सेवा आणि स्थानिक प्रश्नांवरील प्रकल्प यांमधून युवकांमध्ये लोकशाहीची जाणीव विकसित करता येऊ शकते.

लोकशाहीमध्ये विरोधी मताचा सन्मान करणे हा सक्रिय नागरिकत्वाचा महत्त्वाचा भाग आहे. मात्र, नागरिकांच्या उदासीनतेसोबतच अंधसमर्थनाची प्रवृत्तीही लोकशाहीसाठी धोकादायक आहे. एखादा राजकीय पक्ष किंवा नेता आपल्या आवडीचा आहे म्हणून त्याच्या प्रत्येक निर्णयाला समर्थन करणे ही लोकशाही वृत्ती नाही. त्याचप्रमाणे विरोधी पक्ष किंवा वेगळ्या विचारसरणीतील प्रत्येक भूमिकेला चुकीचे ठरविणेही विवेकपूर्ण नागरिकत्वाचे लक्षण नाही. नागरिकांनी व्यक्तीपेक्षा धोरणे, विचार आणि सार्वजनिक कामगिरी यांचे मूल्यमापन केले पाहिजे. लोकशाहीमध्ये प्रश्न विचारणे हा विरोधाचा नव्हे तर जबाबदार नागरिकत्वाचा भाग आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून नागरिकांच्या उदासीनतेवर प्रभावीपणे मात करता येऊ शकते. ग्रामसभा, नगरपालिका सभा आणि स्थानिक विकास प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. गावातील पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, रोजगार आणि पर्यावरणाशी संबंधित प्रश्न नागरिकांनी सामूहिकपणे मांडले तर प्रशासनावर सकारात्मक दबाव निर्माण होतो. सार्वजनिक निधीचा वापर, विकासकामांची गुणवत्ता आणि योजनांचा लाभ याबाबत माहिती घेण्याचा नागरिकांना अधिकार आहे. स्थानिक पातळीवर सक्रिय नागरिकत्वाची सवय लागली तर राष्ट्रीय पातळीवरील लोकशाही सहभागही अधिक अर्थपूर्ण होतो.

लोकशाहीतील नागरिकांची उदासीनता दूर करण्यासाठी शिक्षण आणि मूल्यसंस्कार यांना विशेष महत्त्व आहे. लोकशाहीचे शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकातील धड्यापुरते मर्यादित राहता कामा नये. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष चर्चेत सहभागी करून घेणे, त्यांना प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन देणे, मतभिन्नतेचा आदर शिकविणे आणि संविधानिक मूल्यांचा व्यवहारात उपयोग करून दाखविणे आवश्यक आहे. घर, शाळा, महाविद्यालय आणि समाज या सर्व स्तरांवर संवादाची संस्कृती विकसित झाली तर लोकशाही वृत्ती अधिक मजबूत होईल. स्वतःचे मत मांडताना दुसऱ्याचे मत ऐकण्याची तयारी ही लोकशाहीची मूलभूत शिस्त आहे.

नागरिकांच्या उदासीनतेवर मात करण्यासाठी शासन आणि सार्वजनिक संस्थांचीही जबाबदारी आहे. शासनाची माहिती सहज उपलब्ध असणे, सार्वजनिक सेवांमध्ये पारदर्शकता असणे, नागरिकांच्या तक्रारींवर वेळेवर कार्यवाही होणे आणि प्रशासन नागरिकांशी संवाद साधणारे असणे आवश्यक आहे. नागरिकांना वारंवार अनुभव येत असेल की त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होते, तर शासनावरील विश्वास कमी होऊ शकतो. त्यामुळे पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासन नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी आवश्यक आहे. लोकशाहीमध्ये नागरिकांनी शासनाला प्रश्न विचारणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच शासनाने त्या प्रश्नांना उत्तर देणेही महत्त्वाचे आहे. भारतीय लोकशाहीची शक्ती तिच्या व्यापक लोकसहभागात आहे. भारतातील निवडणुकांमध्ये कोट्यवधी नागरिक सहभागी होतात, विविध सामाजिक घटक राजकीय प्रक्रियेत प्रतिनिधित्व मिळवितात आणि शांततामय मार्गाने सत्तांतर घडते, ही मोठी उपलब्धी आहे. परंतु लोकशाहीची गुणवत्ता केवळ निवडणुकांच्या यशाने मोजता येत नाही. नागरिक वर्षभर सार्वजनिक प्रश्नांमध्ये किती सहभागी होतात, शासनाच्या कामकाजाबाबत किती जागरूक असतात, संविधानिक मूल्यांचा किती आदर करतात आणि सामाजिक न्यायासाठी किती संवेदनशील असतात, यावरही लोकशाहीचे यश अवलंबून असते.

आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाच्या निमित्ताने त्यामुळे प्रत्येक नागरिकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे की आपण केवळ मतदार आहोत की सक्रिय नागरिक? आपल्या परिसरातील सार्वजनिक प्रश्नांची आपल्याला माहिती आहे का? आपण लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारतो का? शासनाच्या योजनांची माहिती घेतो का? चुकीची माहिती पुढे पाठविण्यापूर्वी तिची सत्यता तपासतो का? मतभिन्न असलेल्या व्यक्तीच्या मताचा सन्मान करतो का? संविधानाने दिलेल्या अधिकारांसोबत आपल्या कर्तव्यांची जाणीव ठेवतो का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे भारतीय लोकशाहीच्या वर्तमानाचे चित्र स्पष्ट करू शकतात.

लोकशाही ही केवळ संसदेत किंवा विधानसभेत अस्तित्वात नसते. ती नागरिकांच्या विचारांत, वर्तनात आणि दैनंदिन कृतीत जिवंत राहते. घरात प्रत्येकाचे मत ऐकले जाते तेव्हा, शाळेत प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन दिले जाते तेव्हा, समाजात भिन्न मतांचा आदर केला जातो तेव्हा आणि सार्वजनिक संस्थांना जबाबदार धरले जाते तेव्हा लोकशाही मजबूत होते. नागरिकांची उदासीनता वाढली तर लोकशाहीच्या संस्था असूनही तिचा आत्मा दुर्बल होऊ शकतो. उलट, जागरूक आणि सक्रिय नागरिक असतील तर कोणतीही लोकशाही अधिक सक्षम बनू शकते.

१५ सप्टेंबरचा आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा म्हणूनच केवळ लोकशाहीचा गौरव करण्याचा दिवस नसून तिच्या आरोग्याचे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. भारतीय लोकशाहीसमोर अनेक आव्हाने आहेत; परंतु त्यावर मात करण्याची क्षमता भारतीय समाजातही आहे. नागरिकांनी मतदानाचा अधिकार जबाबदारीने वापरला, सार्वजनिक प्रश्नांमध्ये सक्रिय सहभाग घेतला, संविधानिक मूल्यांचे पालन केले, खोटी माहिती आणि द्वेषपूर्ण प्रचाराला नकार दिला, वंचितांच्या अधिकारांविषयी संवेदनशीलता दाखविली आणि शासनाला सातत्याने उत्तरदायी ठेवले तर लोकशाही अधिक मजबूत होईल. 'माझ्यामुळे काय फरक पडणार?' या उदासीन मानसिकतेऐवजी 'लोकशाही मजबूत करण्यासाठी माझी भूमिका काय?' हा प्रश्न प्रत्येक नागरिकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. कारण लोकशाहीचे भविष्य केवळ सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर अवलंबून नसते; ते नागरिकांच्या जागरूकतेवर, सहभागावर आणि संविधाननिष्ठ वृत्तीवरही अवलंबून असते. नागरिक जागा झाला तर लोकशाही जागी राहते; नागरिक उदासीन झाला तर लोकशाहीची मुळे कमकुवत होऊ लागतात. म्हणूनच भारतीय लोकशाही अधिक सक्षम, समताधिष्ठित आणि न्यायपूर्ण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने केवळ मतदान करणारा मतदार न राहता जागरूक, विवेकी, प्रश्न विचारणारा आणि जबाबदार लोकशाही नागरिक बनणे, हीच आजच्या आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाची खरी गरज आणि काळाची हाक आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, मराठी व समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल – bagate.rajendra5@gmail.com**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनानुसार श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तीचे संवर्धन

## सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तीचे दीर्घकालीन जतन आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (डख), राज्य पुरातत्त्व विभाग तसेच मूर्ती संवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली व सल्ल्याने तसेच मे. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ कोल्हापूर यांच्या आदेशानुसार दि.२३ ते २५ सप्टेंबर या कालावधीत श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तीचे संवर्धनाबाबत भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण यांचे मार्फत तसेच मंदिर समिती व सल्लागार परिषद सदस्य यांच्या उपस्थितीत काम करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

या संदर्भात पुरातत्व विभागाचे अधिकारी यांच्या समवेत मंदिर समितीची दि.१३ सप्टेंबर रोजी दु.३.०० वा. दुरदृष्यप्रणालीद्वारे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली असून, या सभेत मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे, डॉ.दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर), ड.माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, प्रणिताताई भालके तसेच कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, व्यवस्थापक प्रविणकुमार घम, लेखा अधिकारी मुकेश अनेचा तसेच भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (डख) चे उप अधिक्षक डॉ.एस. विनोद कुमार, राज्य पुरातत्व विभागाचे सहायक संचालक डॉ.विलास वाहणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास गुजरे, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे, जतन संवर्धन कामाचे ठेकेदार प्रतिनिधी, मंदिर समितीचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

दि.११ जून रोजी एस कार्तिकेयन, जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विविध तज्ज्ञ, पुरातत्त्व विभागाचे अधिकारी, स्थानिक महाराज मंडळी, मंदिर समितीचे पदाधिकारी, सल्लागार परिषद सदस्य आणि संबंधित अधिकारी यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली होती. प्राप्त तांत्रिक मार्गदर्शन आणि शिफारशींच्या आधारे दि.२२ ते २४ जून या कालावधीत श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तीचे संवर्धनाचे काम करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तथापि, या दरम्यान श्री गणेश लंके व इतर या याचिकाकर्त्यांनी मा. दिवाणी न्यायालय, पंढरपूर येथे दावा दाखल केला व यामध्ये मे. न्यायालयाने स्थगिती दिल्याने


### दि.२३ ते २५ सप्टेंबर या कालावधीत मंदिर दर्शनासाठी (मुखदर्शन व पदस्पर्शदर्शन) बंद राहणार

सदरचे काम करता आले नव्हते. त्यानंतर मा. जिल्हा न्यायालय, सोलापूर व मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ कोल्हापूर येथे श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तीचे जतन, संरक्षण व संवर्धन करण्याच्या दृष्टीने मंदिर समितीने घेतलेल्या भूमिकेला यांनी दि.०७ ऑगस्ट रोजी दिलेल्या अंतिम आदेशाद्वारे महत्त्वपूर्ण न्यायालयीन अधिमान्यता दिली आहे.

तथापि, मे. न्यायालयाने मंजुरी दिल्यानंतर आषाढी यात्रा असल्याने श्रींच्या मूर्ती संवर्धनाचे त्यावेळी काम करता आले नाही. या संवर्धनाच्या कामासाठी आवश्यक तांत्रिक प्रक्रिया सुरक्षितपणे पूर्ण करता यावी तसेच मूर्तीच्या पावित्र्याचे आणि सुरक्षेचे रक्षण करता यावे यासाठी दि.२३ व २५ सप्टेंबर या तीन दिवसांमध्ये श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी (मुखदर्शन व पदस्पर्शदर्शन) पूर्णवेळ बंद ठेवण्यात येणार आहे. दि.२२ सप्टेंबर रोजी पूर्णवेळ दर्शन सुरू राहणार असून, त्यादिवशी रात्री दर्शन बंद झाल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरवात करण्यात येणार आहे. त्यामुळे दि. २३ ते २५ सप्टेंबर या कालावधीत मंदिर बंद राहील.

श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेची मूर्ती ही वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचे केंद्रस्थान असून, पुरातत्त्व विभाग व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण यांचे मार्फत अत्यंत काळजीपूर्वक संवर्धनाचे कार्य केले जाणार आहे. यापूर्वी सन १९८८, २००५, २०१२ आणि २०२० या कालावधीत मूर्तीचे संवर्धन करण्यात आले होते.





मागील संवर्धनास सुमारे पाच वर्षांचा कालावधी झाल्याने मूर्तीची नियमित देखभालीच्या अनुषंगाने मूर्तीला संरक्षक आवरण (झ्रीशलीींळीश उेरींळपस) देण्यात येणार आहे. सदरची संवर्धनाबाबतची संपूर्ण प्रक्रिया भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, छत्रपती संभाजीनगर व राज्य पुरातत्त्व विभाग पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली व भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण यांचे मार्फत पार पडणार आहे. याकामी दि.२३ ते २५ सप्टेंबर या कालावधीत मंदिर दर्शनासाठी बंद राहणार असल्याची वारकरी, भाविक व नागरिकांनी नोंद घ्यावी व प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी केले असून दि. २६ सप्टेंबर पासून दर्शन पूर्ववत सुरू राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

**श्रींच्या मूर्तीची जतन व संवर्धनाची जबाबदारी मंदिर समिती अत्यंत गांभीर्याने पार पाडत आहे. मूर्तींच्या संवर्धनाबाबत भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांकडून पाहणी व तांत्रिक मार्गदर्शन घेण्यात आले आहे. संबंधित सक्षम प्राधिकरणांच्या मान्यता आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसारच पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. मूर्तींच्या प्राचीन स्वरूपाला, पावित्र्याला किंवा धार्मिक परंपरांना कोणतीही बाधा येणार नाही. या संपूर्ण प्रक्रियेत भाविकांच्या श्रद्धेचा नितांत आदर राखून पारदर्शक पद्धतीने काम करण्यात येईल.**

**– डॉ.विलास वाहणे,**
**सहा. संचालक, पुरातत्व विभाग, पुणे.**

# श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती तर्फे श्री गणेशमूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त श्री गणेशाचे उत्साहात स्वागत करून विधिवत मूर्ती प्रतिष्ठापना करण्यात आली.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या सभामंडप येथे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांच्या हस्ते श्री गणेशमूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी श्री गणेशाची पूजा-अर्चा करून गणेशोत्सवाची सुरुवात करण्यात आली.

या प्रसंगी मंदिर समितीच्या नित्योपचार विभागाचे प्रमुख श्री भीमाशंकर सारवडकर, श्री राजेंद्र सुभेदार तसेच मंदिर समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे नूतन कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ शाखा पंढरपूर यांच्या वतीने सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंदिर समितीचे तत्कालीन कार्यकारी अध्यक्ष राजेंद्र शेळके यांचा तीन वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यामुळे त्या जागी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी या पदी मुंबई येथील मंत्रालयामध्ये विविध पदावर कार्यरत राहून आपली सेवा उत्कृष्ट मध्ये बजावणारे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा पंढरपूर यांच्या वतीने करण्यात आला.

यावेळी बार्शी येथील वैराग येथील रहिवासी असणारे आणि आपल्या कर्तृत्वाने शासकीय सेवेमध्ये उत्कृष्ट प्रकारचे सेवा देणारे श्रीकांची यादव म्हणाले मला श्री विठ्ठलाची सेवा करण्याची संधी मिळाली ही माझे भाग्य समजतो खरे ाहता आपणास व सर्व असे आव्हान करतो की माझा सन्मान करून हार तुरे देण्यापेक्षा हार तुरे पुष्पगुच्छ यावर खर्च न करता हा खर्च अन्नछत्र किंवा गोशाळे साठी दिल्यास याचा लाभ श्री विठूराजे चरणी नतमस्तक होण्यासाठी येणाऱ्या भाविक भक्तासह या गोमाता मुख्य प्राण्यांना होईल असे भावनिक उद्धाट यांनी काढले ते पुढे म्हणाले मंदिर समितीचे प्रशासन अधिक गतिमान करून पारदर्शक व शिस्त पद्धतीने करून भावी भक्तांना अधिक प्रकारच्या सुविधा मिळण्याच्या दृष्टिकोनातून मी प्रयत्नशील राहील असे ते शेवटी म्हणाले कार्यकारी अधिकारी यांचा सत्कार महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्री राजेंद्र जी कोरके-पाटील यांच्या शुभहस्ते सर्व पदाधिकारी व कार्यकारी सदस्य यांच्या उपस्थितीत ते करण्यात आला.

यावेळी शहराध्यक्ष शंकर कदम कार्याध्यक्ष नितीन करंडे ज्येष्ठ मार्गदर्शक राधेश बदले-पाटील प्रमोद भोसले कुमार कोरे विक्रम कदम संजय यादव सुनील अधटराव, संतोष मोरे, अतुल मोरे, राजेंद्र करपे, संजय ननवरे, ज्योतीराम कांबळे शुभम पाटील आदीजन उपस्थित होते.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयातील कलाकार युवा महोत्सवासाठी सज्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने बार्शी येथे आयोजित केलेल्या युवा महोत्सवात कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थी कलाकारांनी तब्बल १५ कलाप्रकारात अदाकारी सादर करणार आहेत. त्यासाठी संगीत शिक्षक मयूर स्वामी, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा भीम सोनकांबळे हे विशेष परिश्रम घेत आहेत.

श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथे २८ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या युवा महोत्सवात संगीत, नृत्य, नाट्य, वायय, ललित तसेच व्यसनमुक्ती पथनाट्य, राजस्थानी लोकनृत्य, लावणी, भजन, वक्तृत्व, कथाकथन आदी स्पर्धांसाठी विद्यार्थी कलाकार कसून तयारीस लागले आहेत. त्यांना अक्षय सरदेशमुख आणि महेश स्वामी यांचे सहकार्य लाभत आहे. सांस्कृतिक विभाग प्रमुख भीम सोनकांबळे,



संगीत शिक्षक मयूर स्वामी, प्राध्यापिका मनीषा शिंदे, डॉ शितल झिंगाडे, सौरभ भस्मे, मधुबाला लोणारी यांनी कलाकारांना मार्गदर्शन करत आहेत.

संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, पुनम कोकळगी, रूपाली शहा, गौरी झिंगाडे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# व्यसनमुक्त होणाऱ्या व्यक्तींसाठी मोफत आरोग्य तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : आपण नेहमी एक म्हण ऐकतो. आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या काळात स्वतःच्या शरीराकडे म्हणजेच आरोग्याकडे सामान्यांचे दुर्लक्ष होते. पण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. जर आरोग्य चांगले नसेल तर कोणत्याही प्रकारची संपत्ती आपले आरोग्य वाचवू शकत नाही.



व्यसनमुक्ती पुनर्वसन केंद्रात दाखल असलेल्या व्यक्तींचे देखील व्यसनाधीनतेमुळे स्वतःच्या शरीराकडे दुर्लक्ष झालेले असते. त्यामुळे व्यसनमुक्ती केंद्रात दाखल झाल्यानंतर शारीरिक दुखणी समोर येतात. अशा व्यक्तींना देखील चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात. या उद्देशाने मिरॅकल फाउंडेशन मुंबई (व्यसनमुक्ती पुनर्वसन केंद्र) आणि विवान हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने पुनर्वसन केंद्रात आरोग्य शिबिर भरविण्यात आले होते. या शिबिरात प्रत्येक व्यक्तीची ऑक्सिजन पातळी, रक्तदाब, आवश्यक रक्त चाचणी व आवश्यक असलेल्या व्यक्तींची ईसीजी देखील काढण्यात आली. निरोगी शरीर आणि आनंदी मन हीच आपल्या जीवनाची खरी सुरुवात आहे. यासाठीच व्यसनांपासून दूर राहणे आवश्यक आहे. हा संकल्प यावेळी घेण्यात आला.

या आरोग्य शिबिरासाठी विवान हॉस्पिटलचे डॉ. आय. के. सिंग यांच्यासह वैद्यकीय पथक, परिचारिका व स्वयंसेवक उपस्थित होते. हे आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी मिरॅकल फाउंडेशन व्यसनमुक्ती पुनर्वसन केंद्राचे संस्थापक, अध्यक्ष सुभाषचंद्र (बाबूजी) मनराय, खजिनदार विराज मनराज, केंद्रप्रमुख संतोष मनबोली आणि पंकज कौरा समन्वयक रमेश सांगळे यांच्यासह संपूर्ण स्टाफ यांनी विशेष मेहनत घेतली.

### चेअरमन नागेश फाटे यांच्या हस्ते श्री गणरायाचे पूजन

# पंढरपूर : श्री विठ्ठल अर्बन क्रेडिट सोसायटीत गणरायाची विधिवत पूजा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर येथील श्री विठ्ठल अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. च्या वतीने श्री गणेशाची प्रतिष्ठापना व विधिवत पूजा मोठ्या भक्तिभावात करण्यात आली.

संस्थेचे संस्थापक चेअरमन नागेश एकनाथ फाटे यांच्या हस्ते श्री गणरायाचे पूजन करून आरती करण्यात आली. यावेळी विघ्नहर्त्याच्या चरणी संस्थेच्या प्रगतीसाठी तसेच सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतकांच्या सुख, समृद्धी आणि आर्थिक भरभराटीसाठी प्रार्थना करण्यात आली.




यावेळी बोलताना फाटे म्हणाले की, सहकार हाच समृद्धीचा मार्ग आहे. श्री विठ्ठल अर्बन सोसायटी सर्वसामान्यांचे आर्थिक पाठबळ आहे. गणरायाच्या आशीर्वादाने संस्थेच्या माध्यमातून सभासदांच्या हिताचे उपक्रम अधिक जोमाने राबवले जातील आणि संस्थेची वाटचाल अधिक विश्वासाने पुढे जाईल.

गणेशोत्सवामुळे संस्थेच्या परिसरात प्रसन्न व मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. पूजेनंतर सर्वांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी अण्णा नागटिळक, ड. पांडुरंग चवरे, शिवाजीराव रणदिवे, गोरख बागल, संजय पवार, नवनाथ बचुटे, अर्जुन सावंत, भास्कर गायकवाड, हनुमंत फाटे, नवनाथ फाटे, मारुती घाडगे, ओंकार फाटे, संग्राम कापसे, रमेश फाटे, शुभम फाटे, शशांक फाटे यांच्यासह पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणेशोत्सवानिमित्त निफाड पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त!

## रूट मार्चद्वारे सुरक्षेचा संदेश; गणेशोत्सव निर्विघ्न पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासन सज्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : णेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर निफाड शहरासह पोलीस ठाणे हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी निफाड पोलिसांनी कडेकोट बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. गणेशोत्सव आनंद, भक्ती आणि उत्साहात तसेच शांततेत व निर्विघ्नपणे पार पडावा, यासाठी पो-लीस प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेण्यात येत आहे.



आगामी गणेशोत्सव २०२६ च्या अनुषंगाने निफाड शहरात पोलिसांकडून रूट मार्च काढण्यात आला. या रूट मार्चच्या माध्यमातून नागरिकांना सुरक्षिततेचा संदेश देतानाच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणा पूर्णपणे सज्ज असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी, अपर पोलीस अधीक्षक विमला एम. तसेच निफाड उपविभागीय पोलीस अधिकारी के के पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा रूट मार्च काढण्यात आला. निफाड पोलीस निरीक्षक सारिका अहिरराव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनल फडोळ, पोलीस उपनिरीक्षक विजय गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

या रूट मार्चमध्ये निफाड पोलीस ठाण्याचे १५ पोलीस अमलदार, गणपती बंदोबस्तासाठी आलेले मुंबई लोहमार्ग पोलीस दलातील ५ कर्मचारी तसेच निफाड पथकातील ३८ होमगार्ड जवान, असे एकूण ५८ अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले.

निफाड पोलीस ठाणे हद्दीत एकूण ६२ गणेशोत्सव मंडळे असून, त्यापैकी ५७ मंडळांना अधिकृत परवानगी देण्यात आली आहे. निफाड शहर परिसरात २५ गणेशोत्सव मंडळे असून, त्यापैकी ११ प्रमुख मंडळांवर विशेष लक्ष ठेवण्यात आले आहे.

याशिवाय भाविकांची मोठी गर्दी होत असलेल्या नांदुर्डी येथील श्री वरदविनायक गणपती मंदिरातही विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गर्दीचे नियोजन, वाहतूक सुरळीत ठेवणे, महिलांची व नागरिकांची सुरक्षितता तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांकडून सातत्याने गस्त व निगराणी ठेवण्यात येत आहे.



गणेशोत्सवाच्या काळात अफवा, गैरसमज किंवा समाजकंटकांकडून शांतता भंग करण्याचा कोणताही प्रयत्न होऊ नये, यासाठी पोलीस प्रशासन सतर्क असून, संशयास्पद हालचालींवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरिकांनीही पोलिसांना सहकार्य करून सामाजिक सलोखा आणि शांतता कायम ठेवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

गणेशोत्सव आनंदात साजरा करा; नियमांचे पालन करा!

गणेशोत्सव हा भक्ती, श्रद्धा आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव आहे. त्यामुळे गणेश मंडळांनी तसेच नागरिकांनी ध्वनीप्रदूषण, वाहतूक आणि इतर नियमांचे पालन करावे. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. संशयास्पद व्यक्ती किंवा वस्तू आढळल्यास अथवा कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास तात्काळ निफाड पोलिसांशी संपर्क साधावा.

गणेशोत्सव शांततेत, सुरक्षिततेत आणि उत्साहात पार पाडण्यासाठी निफाड पोलीस प्रशासन पूर्णपणे सज्ज असून, नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.

# कल्याणमध्ये कचरु सोमाजी शिंदे 'दादा' यांचा प्रथम स्मृतिदिना निमित्ताने लौकिक भास्कर शिंदे यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : स्मृतिशेष कचरु सोमाजी शिंदे 'दादा' यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त कल्याण येथील जेतवन बुद्ध विहार, अशोक नगर, वालधुनी येथे अत्यंत भावपूर्ण वातावरणात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याला परिसरातील बौद्ध उपासक, नातेवाईक, मित्रपरिवार आणि हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उप-स्थिती लावली.

कार्यक्रमाची सुरुवात बुद्धवंदना व महामानवांच्या प्रतिमेस अभिवादन करून झाली. त्यानंतर आयोजित केलेल्या वैचारिक व मार्गदर्शक सत्रात प्रमुख वक्त्यांनी कचरु सोमाजी शिंदे यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.

या प्रसंगी प्रा. डॉ. वि. सो. शिंदे यांनी अध्यक्ष स्थान भुषविले त्यांनी आपल्या मनोगतात स्मृती शेष कचरु सोमाजी शिंदे यांच्या ७७व्या वाढदिवसाच्या निमित्ताने घेतलेल्या मुलाखतीत त्यांनी दिलेला संदेश जसे व्यसन करु नका, अंधश्रद्धा पाळू नका, स्वाभिमानाने जगा, एक दुसऱ्याला आधार द्या यांचा उल्लेख केला आहे. तसेच .प्रा. डॉ. अल्का शिंदे / पवार यांनी प्रा. डॉ. वि.सो.शिंदे यांची आधारवड नावाची कविता सादर केली ही कविता दादांच्या एकूणच व्यक्तित्वावर प्रकाश टाकते. यानंतर समाजसेवक आयु. सुनील घेगडमल यांनी दादांच्या स्मृतीना आदरांजली वाहिली आणि आजच्या सामाजिक परिस्थितीवर भाष्य केले.भास्कर शिंदे यांनी आदरांजली वाहताना दादांच्या स्वभावाच्या विविध पैलूनवर चर्चा केली.बौद्धाचार्य सुरेश कटारे यांनी आपले शरीरच खरा मित्र आहे त्याची काळजी आपण घेतली पाहिजे असा संदेश दिला तर बौद्धाचार्य नामदेव दोंदे यांनी स्वरचित कविता सादर केली , संजना मिलिंद शिंदे यांनी बाबांच्या प्रेमळ स्वभावाचा उल्लेख करुन आदरांजली वाहिली तसेच एडवोकेट नागेश कांबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या मनोगतात वक्त्यांनी 'दादा' यांच्या सामाजिक आणि पारिवारिक आठवणींना उजाळा देत त्यांच्या विचारांची प्रेरणा कायम ठेवण्याचे आवाहन केले. तसेच दरवर्षी स्मृतिशेष कचरु सोमाजी शिंदे यांच्या स्मृतिदिना निमित्त शिंदे कुटुंबाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा पुरस्कार देण्याचे घोषित केले. यावर्षीचा पुरस्कार सी ए कोर्स चा अभ्यासक आयु. लौकिक भास्कर शिंदे यांना प्रा.डॉ.वि सो शिंदे लिखित पुस्तके आणि रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास पंडित यांनी अत्यंत नेटकेपणाने केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयु. प्रभाकर शिंदे आणि समस्त शिंदे परिवार आणि जेतवन बुद्ध विहार समितीच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# श्री गणेश चतुर्थी निमित्त श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेस पारंपरिक अलंकार परिधान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री गणेश चतुर्थीच्या निमित्ताने श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेस आकर्षक व पारंपरिक सुवर्ण अलंकार परिधान करण्यात आले. पारंपरिक अलंकारांनी सजलेले श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेचे विलोभनीय रूप पाहण्यासाठी तसेच दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे.


श्री विठ्ठलास सोन्याची पगडी, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड मोठा, हिऱ्याचे कंगन जोड, नाम निळाचा, शिरपेच लहान, मोत्याची कंठी एक पदरी, मोत्याची कंठी दोन पदरी, मत्स्य जोड, सोन्याचा पितांबर, शालिग्राम हार, तोडे जोड, हायकोल, नऊ पदरी चंद्रहार, पाच पदरी चंद्रहार, तुळशीची माळ एक पदरी, चार पदरी मोहरमाळ आदी पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले.

तसेच रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जाव्याच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी व कंबरपट्टा आदी पारंपरिक सुवर्ण अलंकार परिधान करण्यात आले.

या अलंकारांमुळे श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेचे रूप अधिकच मनोहारी व भक्तिमय दिसत असून, भाविकांमध्ये या अलंकारांचे विशेष आकर्षण पाहायला मिळत असले बाबतची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी दिली.

# धर्मा महादेव गायकवाड यांचे निर्वाण ; ज्येष्ठ पत्रकार डॉ. कीर्तिपाल गायकवाड यांना पितृशोक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर/प्रतिनिधी : रेल्वेच्या उथ विभागातील सेवानिवृत्त अधिकारी, प्रबुद्ध प्रकाशनचे प्रकाशक आणि विपश्यना साधक तसेच ज्येष्ठ धम्मशील कार्यकर्ते धर्मा महादेव गायकवाड (वय ८७) यांचे सोमवारी वृद्धापकाळाने निर्वाण झाले. दुपारी ४ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

धर्मा महादेव गायकवाड यांना महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६ डिसेंबर १९५६ रोजीच्या अंत्यदर्शनाचा जवळून साक्षीदार होण्याचा योग लाभला होता. ऐतिहासिक धम्मभूमी देहूरोड यांच्याविषयी त्यांना विशेष आस्था होती. विपश्यना साधना, बौद्ध धम्मचा प्रसार आणि सामाजिक कार्याशी त्यांचे दीर्घकाळ नाते राहिले. त्यांच्या निधनाने धम्म चळवळीतील एक ज्येष्ठ आणि समर्पित कार्यकर्ता गमावल्याची भावना व्यक्त होत आहे.

त्यांची अंत्ययात्रा सोमवारी रात्री १० वाजता विजापूर नाका, गौतम नगर येथील त्यांच्या राहत्या निवासस्थानापासून निघणार आहे. मोदी स्मशानभूमीत बौद्ध धम्मपद्धतीने त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात मुलगा डॉ. कीर्तिपाल, मुली अंजली (चंदा), प्रा. मंगल, सुरेखा, सून प्रा. सुनीता, जावई अशोक, विजय तसेच नातवंडे मिनाक्षी, डॉ. सोनल, अभिजीत, शीतल, सुमेधा, प्रबुद्ध, आकांक्षा, आदर्श, पर्तुंडे, चिकू, पीयू, साक्षी, परी, वरुण असा मोठा परिवार आहे.

धर्मा महादेव गायकवाड यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबीयांवर तसेच परिचित, आप्तेष्ट आणि धम्म चळवळीतील सहकाऱ्यांवर शोककळा पसरली आहे.

# प्रशांत परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त लाडक्या बहिणींना साडी वाटप





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त लाडक्या बहिणींना साडे वाटप उपक्रम श्रीराम मंगल कार्यालय हिजवावी येथील ३५६१, महिला भगिनींना साडी, सौ सीमाताई परिचारक, सौ आदटराव, उप-स्थित महिला नगरसेविका यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी पंढरपूर अर्बन बँकेचे चेअरमन सतीश राव मुळे, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, बालाजी मलपे, विशाल मलपे, तसेच आजी-माजी नगरसेवक, नगरसेविका प्रतिष्ठित नागरिक महिला व पुरुष युवा युती मोठ्या संख्येने उपस्थित होते, नवशक्ती तरुण मंडळ गणेश यादव मित्र मंडळ यांच्या वतीने सदर उपक्रम घेण्यात आले याप्रसंगी जिल्ह्याची माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी आपल्या भाषणात म्हणाले की समाजकारण व राजकारण हे आपण स्वीकारलेली एक कर्म असून नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्याची काम आपण करत असतो हे करत असताना स्वतःला काय मिळाले यापेक्षा आपण इतरांना काय देतो यासाठी प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे कार्यकर्ता कसा असावा याची ज्वलंत व उत्तम उदाहरण म्हणजे गणेश अधटराव गेल्या पंचवीस वर्षाच्या राजकारणामध्ये त्यांनी निरपेक्ष भावनेने आपले सहकार्य केले आहे हे करत असताना इसवीसारख्या भागात विविध उपक्रमाद्वारे जनतेची सुसंवाद साधून त्यांनी या भागाचा कायापालट केला असून माझ्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्ते यांनी पंढरपूर शहर व तालुक्यात अंध अपंग निराधार यासाठी उपक्रम राबवले तसेच महिला व जेष्ठ नागरिकांना क्रीडा स्पर्धा आधी विविध उपक्रम साजरी केली तर महिला व पुरुषांच्या आरोग्यासाठी आरोग्य शिबिराची आयोजन केले अशा विविध उपक्रमातून सर्व थरातील लोकांना एकत्र आणून जे कार्य केले ते खूप मोलाचे आहे असेही त्यांनी उद्गार काढले.

मराठवाडा, कल्याण-कर्नाटक व तेलंगणातील मोठ्या संख्येने देशभक्त सहभागी होणार

माता-भगिनींना तिरंगा साडीचे वितरण

# १७ सप्टेंबरला खसगी खजुरी येथे भव्य देशभक्ती जनजागृती शोभायात्रा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तालुका प्रतिनिधी, अक्कलकोट : महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील उमरगा व आळंद तालुक्यांच्या सीमेवर असलेल्या खसगी खजुरी येथे जय भारत माता सेवा समिती (रजि.), नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सान्निध्यात १७ सप्टेंबर २०२६ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन, कल्याण- कर्नाटक मुक्ती दिन तसेच लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांना अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून भव्य देशभक्ती जनजागृती शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

ा शोभायात्रेत महाराष्ट्रातील मराठवाडा, कर्नाटकातील कल्याण-कर्नाटक आणि तेलंगणातील विविध भागांतून असंख्य देशभक्त सहभागी होणार असल्याने जय भारत माता सेवा समिती वतीने कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात येत आहे. कर्नाटकातील कलबुर्गी, बीदर, यादगीर, रायचूर, कोप्पळ, बागलकोट, बेळगाव आदी जिल्ह्यांसह महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, बीड, हिंगोली, परभणी, जालना, वाशिम, अकोला आदी जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होणार आहेत.

सर्व धर्म समभाव, सर्व भाषांचा आदर, सर्व संस्कृतीचा सन्मान, सर्वांचा विकास आणि देशाचा अभिमान, हीच खरी देशभक्तीची ओळख' हा संदेश जनतेपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावरील खसगी खजुरी येथील राष्ट्रीय महामार्गाच्या संगमावर देशभक्त व शिवभक्तांचा भव्य मेळावा होणार आहे. या जनजागृती शोभायात्रेत विविध धर्म व समाजातील माता-भगिनींना तिरंगा साडीचे वितरण करण्यात येणार आहे. यासोबत औक्षण सोहळा, देशभक्तीपर कार्यक्रम, राष्ट्रभक्तीच्या



घोषणा, बॅनर व फलकांचे प्रदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

१७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले. या ऐतिहासिक घटनेमुळे मराठवाड्यासह तत्कालीन हैदराबाद-कर्नाटक भागातील जनतेला निजामाच्या राजवटीतून मुक्ती मिळाली. या मुक्तिसंग्रामात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण आणि त्यांना अभिवादन करण्यासाठी १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून, तर कर्नाटकात 'विमोचन दिवस' म्हणून साजरा केला जातो.

ंदा महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील खसगी खजुरी येथे या ऐतिहासिक दिवसाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. देशभक्ती, सामाजिक एकता आणि राष्ट्रीय ऐक्याचा संदेश या माध्यमातून देण्यात येणार आहे.या ऐतिहासिक दिवसानिमित्त आयोजित जनजागृती शोभायात्रेत सर्व नागरिक, राष्ट्रप्रेमी, सामाजिक व शैक्षणिक संस्था, व्यापारी संघटना, युवक मंडळे, महिला मंडळे, विविध क्षेत्रांतील प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच देशभक्त बांधव-भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जय भारत माता सेवा समिती (रजि.), नवी दिल्ली, नांदेड यांच्या वतीने करण्यात आले आहे.